दै. महाराष्ट्र टाइम्स

0 6 JUL 2017

# तुकाराम मुंढेंची बदली नको



पीएमपी प्रशासनाने खासगी शाळांमधील विद्यार्थ्यांच्या प्रवासासाठी पुरविण्यात येणाऱ्या बसची भाडेवाढ करण्याचा निर्णय घेतला होता. एकूण ६७ स्कूल बसपैकी ११ शाळांच्या १७ बस वगळता अन्य शाळांनी वाढीव दराने बस स्वीकारल्या होत्या. प्रश्न फक्त ११ शाळांच्या १७ बसचा राहिला होता. त्यानंतरही विनाकारण या प्रकरणाचा बाऊ करून 'पीएमपी'चे व्यवस्थापकीय संचालक तुकाराम मुंढे यांना लक्ष्य करण्यात आले. पुणे महापालिकेचे महापौर, सभागृह नेते, स्थायी समितीचे अध्यक्ष या सर्वांनी तुकाराम मुंढेंचा निषेध करून त्यांना मुख्यमंत्र्यांनी परत बोलवावे अशी मागणी केली. 'पीएमपी'मध्ये व्यवस्थापकीय संचालकपदावर कार्यक्षम अधिकाऱ्याची नियुक्ती झाल्यास सुधारणा होऊ शकते असा पूर्वानुभव आहे. मुंढे हे अतिशय सक्षम अधिकारी असून, 'पीएमपी'मध्ये आमूलाग्र बदल होण्यासाठी घेतलेल्या निर्णयांचे दृश्य परिणाम दिसण्यास सुरुवात झालेली आहे. मात्र, क्षुल्लक बाब पुढे करून सदर विषयाचे विनाकारण राजकारण करून त्याचे भांडवल केले जात आहे. पीएमपी सक्षम करण्यासाठी मुंढेंसारख्या प्रामाणिक अधिकाऱ्याची गरज असून, लोकप्रतिनिधींनी स्वत:चा अहंपणा बाजूला ठेवून त्यांना पाठिंबा देणे हे लोकप्रतिनिधींचे कर्तव्य आहे.

- रमेश धर्मावत